# **श्री. सुहेल शर्मा, भा.पो.से., अपर पोलीस अधीक्षक, कोल्हापूर  व श्री. रफीक शेख, पोलीस नाईक, औरंगाबाद ग्रामीण यांनी एव्हरेस्ट शिखर पादाक्रांत केल्याने महाराष्ट्र पोलीस दलातर्फे त्यांचे अभिनंदन.**




दि.20/05/2016 रोजी भारतीय वेळेनुसार सकाळी 5.55 मिनिटांनी कोल्हापूरचे अप्पर पोलीस अधीक्षक, (तत्कालिन पोलीस उप विभागीय अधिकारी मेहकर जिल्हा बुलढाणा) श्री. सुहेल शर्मा (IPS BATCH NO - 2012 ) यांनी चीनच्या बाजुने एव्हरेस्ट शिखराची चढाई  यशस्वीरित्या पुर्ण केली आहे. अशी असामान्य कामगिरी करणारे श्री. सुहेल शर्मा हे भारत देशाचे व महाराष्ट्र पोलीस दलाचे पहिले आय.पी.एस. अधिकारी आहेत.





औरंगाबाद ग्रामीण जिल्हा पोलीस दलात सन 2006 साली भरती झालेले व खुलताबाद पोलीस ठाणे येथे नेमणूकीस असलेले रफीक शेख यांनी 19 मे, 2016 रोजी सकाळी 09 वाजून 02 मिनिटांनी एव्हरेस्ट शिखर (8848 मीटर) सर करण्याचा पराक्रम केला आहे. त्यांची ही मोहीम 04 एप्रिलला सुरु झाली. तब्बल 45 दिवसांच्या अथक परिश्रमानंतर त्यांनी 19 मे, 2016 रोजी सकाळी 09 वाजून 02 मिनिटांनी एव्हरेस्टवर पाऊल ठेवण्यात यश मिळविले. त्यांच्या या असामान्य कामगिरी बद्दल महाराष्ट्र पोलीस दलाला त्यांचा अभिमान आहे.



